PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Mumbaicha Dabbewala
Year: 2007

Song: Aali Laxmi Daari
Lyricist: Anant Jadhav

आली लक्ष्मी दारी
चिंता मिटेल सारी
आली लक्ष्मी दारी
चिंता मिटेल सारी
दादा मामा धावून या हो
माझं लॉटरीचं तिकीट घ्या हो
माझं लॉटरीचं तिकीट घ्या हो
आली लक्ष्मी दारी
चिंता मिटेल सारी
दादा मामा धावून या हो
माझं लॉटरीचं तिकीट घ्या हो
घ्या हो
माझं लॉटरीचं तिकीट घ्या हो

देईल नशीब तुम्हाला साथ
घाला झटपट खिशात हात
हंहं
देईल नशीब तुम्हाला साथ
घाला झटपट खिशात हात
करा दैवावर तुम्हीचं मात
करा दैवावर तुम्हीचं मात
सुख समृद्धी नांदेल घरात
गोष्ट सांगते खरी
जाऊ नका माघारी
तात्या नाना धावून या हो
माझं लॉटरीचं तिकीट घ्या हो
या ना
माझं लॉटरीचं तिकीट घ्या हो
जो असेल खरा भाग्यवान

लॉटरी ठरेल त्याला वरदान
जो असेल खरा भाग्यवान
लॉटरी ठरेल त्याला वरदान
चारचौघात लाभेल मान
चारचौघात लाभेल मान
आयुष्याचं होईल कल्याण
नका सोडू संधी
दूर होईल मंदी
आक्का ताई धावून या हो

माझं लॉटरीचं तिकीट घ्या हो
या ना
माझं लॉटरीचं तिकीट घ्या हो

कराल खरेदी तुम्ही शेतीवाडी
आणाल अंगणात मारूती गाडी
भुर्र...हा...
कराल खरेदी तुम्ही शेतीवाडी
आणाल अंगणात मारूती गाडी
बांधाल हक्काची टुमदार माडी
बांधाल हक्काची टुमदार माडी
लुटा स्वर्ग सुखाची गोडी
दावा श्रीमंती थाट
बना खरे सम्राट
माय बाप धावून या हो
माझं लॉटरीचं तिकीट घ्या हो
माझं लॉटरीचं तिकीट घ्या हो
आली लक्ष्मी दारी
चिंता मिटेल सारी

Literacy for a Billion

दादा मामा धावून या हो
माझं लॉटरीचं तिकीट घ्या हो

घ्या ना...
माझं लॉटरीचं तिकीट घ्या हो

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*